"स्थापत्यअभियांत्रिकीय सहाय्यक"
पाठ्यक्रमाशी समकक्ष पाठ्यक्रम
ठरविण्याबाबत

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
शासन निर्णय, क्रमांक : रोप्रनि-१००७/प्र.क्र.३२/आस्था-२,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ११ मार्च, २००८

वाचा :- सार्वजनिक बांधकाम विभाग आदेश क्र.: रोप्रनि-१००७/प्र.क्र.३२/आस्था-२,
दिनांक :- २६ सप्टेंबर २००७

**<u>शासन निर्णय :-</u>**

सार्वजनिक बांधकाम विभागातील "स्थापत्य अभियांत्रिकीय सहाय्यक" या पदावरील नियुक्तीकरीता शास अधिसूचना क्रमांक : आरटीआर-१०८९/१२६०/आस्था-२, दिनांक १८ जून, १९९८ अन्वये सेवाप्रवेश विहि करण्यात आले आहेत. सदर सेवाप्रवेश नियमातील नियम ३ (ब) (दोन) अन्वये सदर पदावर नामनिर्देशना नियुक्ती करण्यासाठी शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण व शासनाच्या तंत्रशिक्षण विभागाच्या शासकीय तांत्रि संस्थेकडून घेण्यात येणारी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाची एक वर्ष मुदतीची पाठयक्रम परीक्षा उत्तीर्ण ह शैक्षणिक अर्हता विहित करण्यात आली आहे. त्यानुसार "स्थापत्य अभियांत्रिकीय सहाय्यक" या पदाव नामनिर्देशनाने नियुक्ती करण्यासाठी सदरची शैक्षणिक अर्हता अनिवार्य आहे. परंतु शासनाच्या तंत्रशिक्षण विभागाच्या तांत्रिक संस्थेकडून सदरचा अभ्यासक्रम बंद करण्यात आल्यामुळे "स्थापत्य अभियांत्रिकीय सहाय्यक" या पदाकरीता अर्हताप्राप्त उमेदवार उपलब्ध होत नाहीत, असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे ही अडचण दूर करण्यासाठी अन्य समकक्ष पाठयक्रम अर्हताधारक व्यक्तींना सदर पदावर नियुक्ती देण्यासाठी विचार करण्याच्या दृष्टीने सध्या सुरु असलेले कोणते पाठयक्रम "स्थापत्य अभियांत्रिकीय सहाय्यक" या पाठयक्रमाशी समकक्ष आहेत हे ठरविण्याकरीता उपरोक्त दिनांक २६ सप्टेंबर २००७ च्या आदेशान्वये एक समिती गठित करण्यात आली होती.

२. सदर समितीने, सध्या सुरु असलेल्या व "स्थापत्य अभियांत्रिकीय सहाय्यक" या पाठयक्रमाशी सुसंगत असलेल्या पाठयक्रमाबाबत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाकडून माहिती घेऊन त्याचा अभ्यास केला व समकक्ष पाठयक्रमाबाबत शासनास शिफारशी सादर केल्या. त्या शिफारशींच्या अनुषंगाने, सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत "स्थापत्य अभियांत्रिकीय सहाय्यक" या पदावर नामनिर्देशनाने उमेदवारांची नियुक्ती करण्यासाठी

पुढील अभ्यासक्रम "स्थापत्य अभियांत्रिकीय सहाय्यक" या पाठ्यक्रमाशी समकक्ष समजण्यात यावेत, असा निर्ण
शासनाने घेतला आहे.

अ) आर्किटेक्चरल ड्रॉफ्टस्मन (वास्तुशास्त्रीय आरेखक)

ब) कन्स्ट्रक्शन सुपरवायझर (बांधकाम पर्यवेक्षक)

हे आदेश तात्काळ लागू होतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

स्वाक्षरी/-
(भि. य. मंता)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

सर्व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग
मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, मुंबई.
सर्व अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळे,
किनारी अभियंता, मुंबई.
संचालक, उपवने व उद्याने, मुंबई.
संचालक, विकास विभाग चाळी, वरळी, मुंबई.
प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मर्यादीत मुंबई.
स्वीय सहाय्यक, सचिव (बांधकामे), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
स्वीय सहाय्यक, सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
महालेखापाल - १, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
महालेखापाल - २, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
कार्यासन आस्था २ (निवड नस्ती) सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.

My doc/G.R.folder/civil